महाज्ञानदीप
यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक– ४२२२२२
संपर्क : ७८२१९२३५५२
ई-मेल : mahadnyandeep@ycmou.ac.in
संकेतस्थळ : https://mahadnyandeep.org/

MAHADNYANDEEP
Yashwantrao Chavan
Maharashtra Open University
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Goverdhan, Nashik - 422 222
Contact : 7821923552
Email : mahadnyandeep@ycmou.ac.in
Website : https://mahadnyandeep.org/

MahaDnyanDeep/2026/Aug/14 Date: 14/08/2026

**प्रति,**

**सर्व नियुक्त Single Point of Contact (SPOCs),**
महाज्ञानदीप,
महाराष्ट्र.

**विषय : महाज्ञानदीप पोर्टलवर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रसिद्धी व प्रसाराबाबत.**

महोदय / महोदया,

**महाज्ञानदीप हा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वपूर्ण डिजिटल शिक्षण उपक्रम असून, "शिक्षण कुठेही, कधीही!" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना दर्जेदार व कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.**
या अनुषंगाने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी महाज्ञानदीप पोर्टलवर खालील **तीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम विनामूल्य (Free)** उपलब्ध करून देण्यात आले आहेत:

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | भाषा | कालावधी | शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | **English Communication for Academic and Professional Skills** | English | सुमारे 03 महिने | **Free** |
| 2 | **Certificate Course in Accounting & Taxation** | Marathi | सुमारे 03 महिने | **Free** |
| 3 | **Certificate Course in Basics of Agricultural Science** | Marathi | सुमारे 03 महिने | **Free** |

सदर अभ्यासक्रम हे **Online mode** मध्ये असून, सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासासोबतच रोजगाराभिमुख व व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

1. **English Communication for Academic and Professional Skills** या अभ्यासक्रमामध्ये Listening, Speaking, Reading, Writing, Grammar, Vocabulary, Professional Writing, Public Speaking, Interview Skills आणि Digital Communication यांसारख्या कौशल्यांवर भर देण्यात आला आहे.
2. **Certificate Course in Accounting & Taxation** मध्ये Accounting, Bookkeeping, Income **Tax**, TDS, GST Registration, Invoicing आणि GST Return Filing यांसारख्या व्यावहारिक बाबींचा समावेश आहे.

3. **Certificate Course in Basics of Agricultural Science** मध्ये Soil Management, Crop Production, Horticulture, Irrigation, Sustainable Agriculture, Farm Mechanization आणि आधुनिक Agritech innovations याबाबत मूलभूत ज्ञान दिले जाणार आहे.

**SPOCs यांच्याकडून अपेक्षित कार्यवाही :**

महाज्ञानदीपचा हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आपण आपल्या स्तरावर खालीलप्रमाणे **प्रसिद्धी व प्रचार-प्रसार** करावा:

1. आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील विद्यार्थ्यांना सदर मोफत अभ्यासक्रमांची माहिती द्यावी.
2. संबंधित **WhatsApp Groups, Telegram Groups, Social Media Pages, Notice Boards, Email Groups** इत्यादी माध्यमातून course creatives व registration link प्रसारित करावा.
3. आपल्या संपर्कातील इतर महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यार्थ्यांपर्यंतही सदर माहिती पोहोचवावी.
4. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी व गरजेनुसार योग्य अभ्यासक्रमासाठी नोंदणी करण्यास प्रोत्साहित करावे.
5. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या **Free Certificate Courses** चा लाभ घ्यावा यासाठी सक्रियपणे जनजागृती करावी.

**Registration :**

**महाज्ञानदीप पोर्टल :** https://mahadnyandeep.org/

विद्यार्थ्यांनी वरील पोर्टलला भेट देऊन उपलब्ध अभ्यासक्रमांची माहिती घेऊन संबंधित अभ्यासक्रमासाठी नोंदणी करावी.

तरी, आपण या तीनही अभ्यासक्रमांची आपल्या कार्यक्षेत्रात **मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवावी**, ही विनंती.

आपल्या सहकार्यामुळे महाज्ञानदीपच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व कौशल्याधारित शिक्षणाची संधी उपलब्ध होण्यास निश्चितच मदत होईल.

**महत्त्वाची सूचना – सदर अभ्यासक्रम दि. १५ ऑगस्ट २०२६ ते १५ डिसेंबर २०२६ या तीन महिन्यांसाठीच उपलब्ध असून या अभ्यासक्रमांची ऑनलाईन परीक्षा १५ डिसेंबर २०२६ पूर्वी होणार आहे.**

**सहकार्याबद्दल धन्यवाद.**

MahaDnyanDeep * Y.C.M. Open University, Nashik

**आपला विश्वासू,**

**प्रो. गणेश लोखंडे**

प्रमुख, महाज्ञानदीप

**संलग्नक :**

1. English Communication for Academic and Professional Skills – Course Details
2. Certificate Course in Accounting & Taxation – Course Details
3. Certificate Course in Basics of Agricultural Science – Course Details